दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक


# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com संपादक : अजय भांगे https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● गुरुवार दि.२२ जानेवारी २०२६ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक १४९ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Thrusday 22 January 2026 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 149 ● Pages 4 ● Rate 4 Rs







# ‘लाडक्या बहिणीं’ना जि.प.च्या मतदानापूर्वीच मिळणार लाभ

## सामाजिक न्याय विभागाचा ३९३ कोटींचा निधी वितरित

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई (वृत्तसंस्था)**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण’ योजनेतील महिलांना डिसेंबरचा लाभ देण्यासाठी राज्य सरकारच्या सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाने ३९३.२५ कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यास मान्यता दिली. त्यामुळे आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पात्र महिला लाभार्थींना डिसेंबर २०२५ चा लाभ मतदानापूर्वीच खात्यात जमा होणार आहे. तसेच तांत्रिक चुकांमुळे नोव्हेंबर-डिसेंबरपासून अडकलेले हप्तेही पडताळणीनंतर मिळणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.१ जानेवारीला लाडक्या बहिणींच्या खात्यात नोव्हेंबरचा १५०० हजार लाभ देण्यात आला होता. डिसेंबरचा लाभ मकरसंक्रातीला देण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले होते. मात्र १५ जानेवारीला महापालिकेच्या निवडणुका असल्याने विरोधी पक्षांनी हरकत घेतली होती. त्यामुळे डिसेंबरचा लाभ थांबवण्यात आला होता. आता ५ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या मतदानापूर्वीच बहिणींच्या खात्यात प्रत्येकी १,५०० रुपये जमा होणार आहेत. सामाजिक न्याय विभागाचा हा निधी प्रामुख्याने अनुसूचित जाती आणि नवबौद्ध प्रवर्गातील महिलांसाठी उपलब्ध करून देण्यात आला आहे.महाराष्ट्र राज्य सरकारने २८ जून २०२४ रोजी सादर केलेल्या अतिरिक्त अर्थसंकल्पात या महत्त्वाकांक्षी योजनेची घोषणा केली होती. राज्यातील महिलांचे आर्थिक स्वावलंबन, आरोग्य आणि पोषण यामध्ये सुधारणा करण्याच्या उद्देशाने ही योजना १ जुलै २०२४ पासून संपूर्ण राज्यात लागू करण्यात आली. विशेष म्हणजे, जुलै आणि ऑगस्ट या दोन्ही महिन्यांचा एकत्रित हप्ता (३००० रुपये) रक्षाबंधनाच्या निमित्ताने ऑगस्टमध्ये महिलांच्या खात्यात जमा करून या योजनेचा प्रत्यक्ष शुभारंभ झाला. मात्र, आता योजनेत अडचणी येत आहेत.ई-केवायसी अर्जामध्ये कुटुंबातील कुणी सरकारी नोकरीत नाही ना, असा प्रश्न विचारण्यात आला होता. नकारात्मक पद्धतीने हा प्रश्न विचारण्यात आल्याने अनेक महिलांचा गोंधळ झाला. अनेक महिलांनी चुकीची माहिती नोंदवल्याने त्या सरकारी कर्मचाऱ्यांच्या नातेवाईक असल्याचे सिस्टिममध्ये दिसून आले. परिणामी त्यांची पात्रता तात्पुरती रद्द झाली आहे. त्यामुळे महिलांचे नोव्हेंबर व डिसेंबर महिन्यांचे हप्ते अडकून पडले आहेत. तांत्रिक कारणाचा फटका सुमारे २४ लाख महिलांना सहन करावा लागला आहे. मात्र, आता अंगणवाडी सेविकांमार्फत प्रत्यक्ष क्षेत्रीय पडताळणी सुरू करण्यात आली असून, पात्र महिलांचे अडकलेले हप्ते युद्धपातळीवर जमा केले जाणार आहेत.




**केवायसी चुकलेल्यांची अंगणवाडी सेविकांमार्फत प्रत्यक्ष पडताळणी काही कारणास्तव ई-केवायसी करताना महिलांनी चुकीचा पर्याय निवडण्याची बाब निदर्शनास आली आहे. म्हणूनच, योजनेच्या निकषांनुसार या लाभार्थी महिलांची क्षेत्रीय स्तरावर अंगणवाडी सेविकांमार्फत प्रत्यक्ष पडताळणी करण्याच्या सूचना राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. लवकरचद याची तपासणी होणार आहे. - अदिती तटकरे, महिला व बालविकास मंत्री**

# राज्यस्तरीय शरीरसौष्ठव स्पर्धेसाठी बीड जिल्ह्याचा संघ जाहीर

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**




महाराष्ट्र बॉडी बिल्डिंग असोसिएशन, मुंबई व इंडियन बॉडी बिल्डर्स फेडरेशन यांच्या मान्यतेने तसेच अहिल्यानगर असोसिएशन ऑफ बॉडी बिल्डिंग अँड फिजीक स्पोर्ट्स यांच्या विद्यमाने ज्युनिअर महाराष्ट्र श्री २०२६ (ज्युनिअर, मास्टर्स व दिव्यांग गट) राज्यस्तरीय शरीरसौष्ठव स्पर्धेचे आयोजन शनिवार, दिनांक ३१ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता विठ्ठल लॉन्स, राहुरी, जिल्हा अहिल्यानगर येथे करण्यात आले आहे.

या स्पर्धेसाठी बीड जिल्ह्याचा संघ निवडण्यासाठी रविवार, दिनांक १८ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ६.३० वाजता मराठवाडा बॉडी बिल्डर्स असोसिएशनच्या वतीने लाईफ हेल्थ क्लब (लाईफ स्टाईल जिम), महात्मा फुले शॉपिंग सेंटर, नवी भाजी मंडई, बीड येथे निवड चाचणी स्पर्धा घेण्यात आली.

या निवड चाचणी स्पर्धेतून मास्टर्स बॉडी बिल्डिंग (५५ ते ६० वर्षे वयोगट) मध्ये सय्यद हारून शब्बीर हुसेन सिद्दीकी तर ज्युनिअर (२१ वर्षांखालील वयोगट) मध्ये फुंदे ज्ञानेश्वर बालासाहेब (परळी) यांची निवड करण्यात आली. तसेच प्रशिक्षक म्हणून सय्यद अमान उल्लाह यांची निवड एम.बी.बी.ए. व आय.बी.बी.एफ.च्या नियमांनुसार करण्यात आली आहे.

ही निवड चाचणी स्पर्धा मराठवाडा बॉडी बिल्डर्स असोसिएशनचे सचिव डॉ. सय्यद अरशियान उल्लाह मिसबाह उल्लाह व डॉ. सय्यद मसीह यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. स्पर्धेसाठी शेख शकील मुहम्मद, वेटलिफ्टिंग प्रशिक्षक शेख वसीम सर, जिल्ह्यातील शरीरसौष्ठव खेळाडू, जिम चालक-मालक तसेच प्रशिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.निवड झालेल्या खेळाडू व प्रशिक्षक सय्यद अमान उल्लाह यांना आगामी राज्यस्तरीय स्पर्धेसाठी मराठवाडा बॉडी बिल्डर्स असोसिएशनचे अध्यक्ष मा. मंत्री आमदार धनंजय मुंडे, कार्याध्यक्ष आमदार विजयसिंह पंडित (राजे), जिल्हा बॉडी बिल्डिंग असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. योगेश भय्या क्षीरसागर, ड. शेख शफिक भाऊ, श्री. अविनाश नाईकवाडे, श्री. विक्रांत हजारी, मुकर्म जान पठाण तसेच सय्यद सिराज सर (परळी) यांनी शुभेच्छा दिल्या.

# रेल्वे कामाला गती देण्यासाठी खा.बजरंग सोनवणे घेणार आढावा

## विविध विभागाचे अधिकारी राहणार उपस्थित

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वेमार्गातील कामाला गती मिळावी, प्रलंबित प्रश्न वेळेत सुटावेत आणि बीडकरांना लवकर रेल्वे प्रवासाचा लाभ व्हावा, यासाठी खा.बजरंग सोनवणे प्रयत्न करत आहेत. दि.२४ जानेवारी रोजी रेल्वेच्या कामांचा ते आढावा घेणार आहेत. आयोजीत आढावा बैठकीला विविध विभागाचे प्रमूख अधिकारी उपस्थित राहणार आहेत.अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वे मार्गावरील प्रलंबित प्रश्न, रखडलेली विकासकामे तसेच प्रवाशांना भेडसावणाऱ्या विविध अडचणींबाबत खा.बजरंग सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली शनिवार, २४ जानेवारी रोजी सकाळी ११वाजता जिल्हाधिारी कार्यालय येथे महत्त्वपूर्ण आढावा बैठक आयोजित करण्यात आली आहे. बैठकीत बीड जिल्ह्यासह मराठवाड्यातील रेल्वे प्रवाशांच्या मूलभूत समस्यांवर सखोल चर्चा करण्यात येणार आहे. रेल्वे गाड्यांचे थांबे, वेळापत्रकातील अडचणी, प्रवासी सुविधांचा अभाव, स्थानकांवरील स्वच्छता, प्रकाशयोजना, सुरक्षितता तसेच अपूर्ण विकासकामे हे प्रमुख मुद्दे बैठकीच्या अजेंड्यावर आहेत.



बीड-परळी रेल्वे मार्गावरील अनेक कामे अद्याप अपूर्ण आहेत. याबाबत रेल्वे प्रशासनाने तातडीने ठोस कार्यवाही करावी, विकासकामांना गती द्यावी तसेच प्रवासी सेवा अधिक सक्षम करावी, याबाबत चर्चा होणार आहे. खासदारांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीकडे जिल्ह्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे. ‘रेल्वे ही सामान्य जनतेची महत्त्वाची वाहतूक सेवा आहे. त्यामुळे प्रवाशांच्या अडचणी दूर करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे,’ अशी भूमिका खा.बजरंग सोनवणे यांची आहे. या बैठकीतून बीड जिल्ह्यातील रेल्वे सुविधांबाबत सकारात्मक निर्णय होतील, रखडलेल्या कामांना गती मिळेल आणि प्रवाशांना दिलासा मिळणार आहे.

# अंधेरीकरांनी परिवर्तनाचा कौल दिला; महायुतीवर विश्वास, नवनिर्वाचित नगरसेवकांवर जबाबदारी

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । अरविंद बनसोडे कुरनूरकर**

आज अंधेरीकरांनी मतपेटीतून एकजुटीने दिलेल्या कौलातून परिवर्तनाची स्पष्ट इच्छा व्यक्त केली आहे. या जनादेशातून महायुतीकडे मुंबईची धुरा सोपवताना अंधेरीतील नवनिर्वाचित नगरसेवकांवर मोठी जबाबदारी विश्वासाने सोपवण्यात आली आहे, असे मत महायुतीकडून व्यक्त करण्यात आले.

मतदानातून उमटलेला हा निर्णय अंधेरीकरांच्या विश्वासाचा, आत्मविश्वासाचा आणि स्वाभिमानाचा प्रतीक असल्याचे सांगत, अकार्यक्षमतेला ठाम नकार देत मतदारांनी विचारपूर्वक आणि धैर्याने निर्णय घेतल्याचे महायुतीने नमूद केले. शाईच्या ताकदीने विकासाची दिशा बदलता येते, हे अंधेरीकरांनी दाखवून दिल्याचेही यावेळी स्पष्ट करण्यात आले.या विजयातून मिळालेल्या पाठबळाच्या जोरावर अंधेरीचा कायापालट घडवण्याची ठाम बांधिलकी सर्व नवनिर्वाचित नगरसेवकांनी व्यक्त केली आहे. अधिक सुरक्षित, अधिक सक्षम आणि अधिक उज्ज्वल मुंबई व अंधेरीसाठी नव्या आशेचा प्रवास सुरू झाल्याचे संकेत या जनादेशातून मिळत असल्याचे महायुतीचे म्हणणे आहे.

या ऐतिहासिक जनादेशासाठी सर्व सुज्ञ अंधेरीकरांचे मनापासून आभार मानत, नवनिर्वाचित नगरसेवकांचे अभिनंदन करण्यात आले आहे.

# तळोदा तालुक्यातील मोड शिवारात दोन बिबट्यांची जीवघेणी झुंज; एका नर बिबट्याचा मृत्यू

दैनिक वादळ वार्ता

**नंदूरबार । दिपक गोसावी**

तळोदा तालुक्यातील मोड शिवारात दोन बिबट्यांमध्ये झालेल्या वर्चस्वाच्या लढाईत एका दोन वर्षीय नर बिबट्याचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे परिसरात बिबट्यांची दहशत वाढली असून, झुंजीत जखमी झालेला दुसरा बिबट्या याच परिसरात असण्याच्या शक्यतेने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की,मोड येथील कॉम्प्रेड बी.टी.आर. हायस्कूलच्या मागील बाजूला असलेल्या ज्वारीच्या शेतात बुधवारी सकाळी एक बिबट्या मृतावस्थेत आढळून आला. सरपंच सविता गावित यांनी या घटनेची माहिती तात्काळ वनविभागाला दिली. वनविभागाच्या पथकाने घटनास्थळी धाव घेऊन तपास केला असता, हा बिबट्या मंगळवारी दुपारीच शेताच्या बांधावर जखमी अवस्थेत पडलेला होता, अशी माहिती समोर आली. मात्र, प्रत्यक्षदर्शींनी त्याला मृत समजून भीतीपोटी कोणालाही कळवले नव्हते. रात्रीच्या सुमारास जखमी बिबट्या दुसऱ्या शेतात गेला आणि तिथेच त्याचा मृत्यू झाला. उपवनसंरक्षक अधिकारी सुहास चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली वनविभागाच्या पथकाने घटनास्थळाचा पंचनामा केला. पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. अजय मोळके यांनी मृत बिबट्याचे शवविच्छेदन केले.



त्यावरून बिबट्याचा मृत्यू दुसऱ्या बिबट्याशी झालेल्या झुंजीमुळे झाला आहे. मृत बिबट्याच्या शरीरावर अनेक जखमा आढळल्या आहेत, मात्र त्याचे सर्व अवयव सुस्थितीत असल्याने शिकारीचा प्रकार नसल्याचे स्पष्ट झाले आहे.मृत बिबट्याचे वय अंदाजे दोन वर्षे आहे. संध्याकाळी तळोदा येथे वनविभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत मृत बिबट्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सहाय्यक वनसंरक्षक अधिकारी अमोल आडे, संजय पवार, वनपरिक्षेत्र अधिकारी शंतनू सोनवणे, वनपाल अपर्णा लोहार व इतर कर्मचारी उपस्थित होते.या घटनेनंतर मोड परिसरात मोठ्या प्रमाणावर दहशत पसरली आहे. झुंजीत एक बिबट्या दगावला असला, तरी त्याच्याशी झुंज देणारा दुसरा बिबट्याही जखमी असण्याची दाट शक्यता आहे. जखमी बिबट्या अधिक हिंस्त्र होऊ शकतो, या भीतीने शेतकरी आणि शेतमजूर शेतात जाण्यास धजावत नाहीत. वनविभागाने तात्काळ या दुसऱ्या बिबट्याचा शोध घेऊन त्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# ५ महिन्याचे लहान बाळ असलेल्या सालगड्याच्या पत्नीचा विनयभंग

दैनिक वादळ वार्ता

**गौतम बचुटे । केज**

पाच महिन्याच्या लहान बाळासह शेतात राहत असलेल्या सालगड्याच्या पत्नीचा; तिचा पती घरी नसताना, तू मला आवडतेस. असे म्हणून वाईट हेतूने हात धरून विनयभंग करण्यात आला आहे. या प्रकरणी पीडितेच्या तक्रारी वरून विनयभंग आणि ट्रॉसिटी प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे.

या बाबतची माहिती अशी की, धाराशिव जिल्ह्यातील सालगडी त्याची २० वर्षीय पत्नी व ५ महिन्याचे बाळ हे केज तालुक्यातील एका शेतकऱ्याच्या शेतात राहून शेतमजुरी करीत आहेत. दि. २० जानेवारी रोजी सकाळी ९:०० वा. च्या सुमारास पीडित तरुणीचा पती मालकाच्या शेतात कामासाठी गेला होता. २० वर्षीय पीडिता ही तिच्या ५ महिन्याच्या लहान बाळा सोबत एकटीच शेतातील घरी होती. मोटरसायकलचा आवाज ऐकून ती विवाहित तरुणी घरा बाहेर आली असता गावातील ऋषीकेश चौरे हा तिथे आला. त्याने तुझ्या नवऱ्याकडे नव्हे तर माझे तुझ्याकडे काम आहे. तू मला आवडतेस. तुला इंस्टाग्रामवर मेसेज करून तू मला उत्तर दिले नाहीस. असे म्हणून वाईट हेतूने तिच्या हाताला धरुन तिचा विनयभंग केला. विवाहित तरुणीने ही घटना तिच्या नवऱ्याला सांगणार असे म्हणताच त्याने तिला जातीवाचक शिवीगाळ करून तुम्हाला जिवंत ठेवणार नाही. असे म्हणून जीवे मारण्याची धमकी दिली.या प्रकरणी दि. २१ जानेवारी रोजी पीडित विवाहित तरुणी हिने केज पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारी वरून ऋषिकेश चौरे याच्या विरुद्ध गु. र. नं. ३०/२०२६ ट्रॉसिटीचे कलम ३(१)(आर), ३(१)(एस), ३(१)(डब्ल्यू) (आय) यासह भा. न्या. सं. ७४, ७५, ३५१(२), ३५२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या प्रकरणी अप्पर पोलिस अधीक्षक चेतना तिडके या तपास करीत आहेत.

# संपादकीय

## आता कसोटी अपेक्षापूर्तींची

मुंबईकरांना फक्त इतकंच हवं असतं – आयुष्य थोडं तरी सोपं व्हावं. सकाळी कामावर जाताना अडचण नको, पाणी–वीज वेळेवर मिळावं, आजारी पडलो तर चांगला इलाज मिळावा, मुलांना नीट शिक्षण मिळावं आणि शहरात सुरक्षितपणे, सन्मानाने जगता यावं. सत्तेत आलेल्यांनी हे करून दाखवलं, तरच लोक मनापासून म्हणतील – 'आमचं मत खरंच कामी आलं'

अखेर नऊ वर्षांनंतर का होईना मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुका झाल्या. महानगरपालिका निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर शहरात वेगळीच हवा तयार होते. कोण जिंकलं, कोण हरलं, कोण सत्तेत आलं – यावर चर्चा तर होतेच, पण त्याहून जास्त चर्चा होते ती सामान्य माणसाच्या अपेक्षांची. कारण ही निवडणूक म्हणजे फक्त राजकीय पक्षांचा खेळ नाही, तर आपल्या रोजच्या आयुष्याशी थेट जोडलेली गोष्ट आहे. आपण चालतो ते रस्ते, आपण पितो ते पाणी, आपण प्रवास करतो ती बस, रुग्ण जातो ते रुग्णालय, मुलं जातात ती शाळा – हे सगळं पालिकेवर अवलंबून असतं. त्यामुळे निकाल लागल्यानंतर लोकांच्या मनात आनंद, आशा, अपेक्षा आणि थोडी भीती – अशा सगळ्या भावना एकत्र येतात.सगळ्यात आधी लोकांना वाटतं,'आपण दिलेलं मत वाया गेलं नाही.' मतदानाच्या दिवशी रांगेत उभं राहून, ऊन–पावसाची तमा न बाळगता दिलेलं मत आता कुणाच्या तरी हातात सत्ता देतं, ही जाणीव लोकांना समाधान देते. प्रचारात उमेदवारांनी आणि पक्षांनी जी वचने दिली, ती आता तरी पूर्ण होतील, अशी आशा सगळ्यांच्या मनात असते. आपल्या भागातले खड्डे बुजतील, रस्ते नीट होतील, पाणी वेळेवर येईल, कचरा रोज उचलला जाईल, असं साधं–सोपं जगणं लोकांना हवं असतं.पावसाळ्यात रस्त्यावर पाणी साचू नये, घरात पाणी घुसू नये, गटारं तुंबू नयेत, दुर्गंधी कमी व्हावी ही सामान्य माणसाची सगळ्यात मोठी अपेक्षा असते. आजारी पडलो तर जवळच दवाखाना असावा, तिथे डॉक्टर मिळावा, औषध मिळावं, रांगेत तासन्तास उभं राहावं लागू नये, असं त्यांना वाटतं. शाळेत शिक्षक वेळेवर यावेत, मुलांना चांगलं शिक्षण मिळावं, शाळा स्वच्छ असावी, चांगल्या पद्धतीचे शिक्षण घेऊन एक चांगली पिढी तयार व्हावी एवढंच त्यांना हवं असतं.झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांसाठी निवडणूक म्हणजे आयुष्य बदलण्याची आशा असते. पक्कं घर, नळाचं पाणी, शौचालय, वीज, ड्रेनेज, कचरा उचलण्याची नीट सोय हे सगळं त्यांना फार महत्त्वाचं वाटतं. योजना जाहीर होतात, पण त्या प्रत्यक्षात याव्यात, फक्त कागदावरच राहू नयेत, अशी त्यांची इच्छा असते. पुनर्वसन करताना लोकांना त्रास न होता, सन्मानाने घर मिळावं, अशी त्यांची अपेक्षा असते.तरुण मुलं–मुलींना नोकरीची, कामधंद्याची, शिकण्याच्या संधींची फार अपेक्षा असते. शहरात ट्रेन–बस नीट चालाव्यात, गर्दी कमी व्हावी, प्रवास थोडा तरी सोपा व्हावा, असं त्यांना वाटतं. सरकारी कामं ऑनलाइन सोपी व्हावीत, प्रमाणपत्र, परवाना, जन्मदाखले , मृत्यू प्रमाणपत्र , कर यासाठी ऑफिसात चकरा माराव्या लागू नयेत, अशी त्यांची इच्छा असते. शहर आधुनिक व्हावं, पण त्याचा फायदा फक्त श्रीमंतांनाच नाही, तर सामान्य माणसालाही व्हावा, हीच त्यांची खरी अपेक्षा असते.महिलांना सगळ्यात जास्त हवं असतं ते म्हणजे सुरक्षितता. रस्त्यावर दिवे असावेत, बस–रेल्वेत सुरक्षित वाटावं, रात्री उशिरा घरी जाताना भीती वाटू नये, असं त्यांना वाटतं. सार्वजनिक शौचालय स्वच्छ असावीत, दवाखान्यात महिलांसाठी नीट सोय असावी, गरोदर महिलांची नीट काळजी घेतली जावी, अशी त्यांची अपेक्षा असते. महिलांना कामधंद्याच्या संधी मिळाव्यात, प्रशिक्षण मिळावं, स्वतःच्या पायावर उभं राहता यावं, हीसुद्धा मोठी अपेक्षा असते. वृद्ध लोकांना शांत आणि सुरक्षित आयुष्य हवं असतं. चालायला चांगले रस्ते, बसायला बाक, बागा, मोफत किंवा स्वस्त औषधं, सरकारी दवाखान्यात नीट इलाज एवढंच त्यांना पुरेसं वाटतं. त्यांच्याशी आदरानं वागलं जावं, कुठल्याही कामासाठी त्यांना हेलपाटे मारावे लागू नयेत, असं त्यांना वाटतं.दुकानदार, छोटे व्यावसायिक, फेरीवाले यांनाही पालिकेकडून खूप अपेक्षा असतात. कर प्रणाली सोपी असावी, दंड उगाच लावू नये, लायसन्स पटकन मिळावं, बाजार स्वच्छ आणि नीटनेटका असावा, असं त्यांना वाटतं. ग्राहक येण्यासाठी रस्ता, लाईट, पार्किंग यांची सोय चांगली असावी, अशी त्यांची अपेक्षा असते. पण एवढ्या सगळ्या अपेक्षांबरोबरच लोकांच्या मनात थोडी भीती आणि शंका असतेच. 'निवडणुकीत जे बोलले, ते खरंच करतील का?' 'फक्त भाषणच राहील की काम होईल?' 'भ्रष्टाचार कमी होईल का?' असे प्रश्न लोक स्वतःलाच विचारतात. आधीही अनेक वेळा मोठी वचने दिली गेली, पण सगळी पूर्ण झालीच असं नाही. म्हणून आता लोक म्हणतात – आम्हाला मोठी भाषणं नकोत, आम्हाला काम करून दाखवा.आज लोक जास्त जागरूक झाले आहेत. सोशल मीडियावर फोटो टाकून रस्त्याचे खड्डे दाखवतात, कचऱ्याचे ढीग दाखवतात, पाण्याच्या समस्यांबद्दल लिहितात. चुकीचं वाटलं तर आवाज उठवतात. त्यामुळे सत्तेत बसलेल्यांवर आता जास्त दबाव असतो.शेवटी मुंबईकरांना फार अवघड काही नको असतं. त्यांना फक्त इतकंच हवं असतं – आयुष्य थोडं तरी सोपं व्हावं. सकाळी कामावर जाताना अडचण नको, पाणी–वीज वेळेवर मिळावं, आजारी पडलो तर चांगला इलाज मिळावा, मुलांना नीट शिक्षण मिळावं, आणि शहरात सुरक्षितपणे, सन्मानाने जगता यावं. सत्तेत आलेल्यांनी हे करून दाखवलं, तरच लोक मनापासून म्हणतील – आमचं मत खरंच कामी आलं. मात्र हे खरं होईल का नाही ते येणारा काळच ठरवेल!

# अक्कलकुवा तालुक्यातील विना परवाना गुराळ आदिवासी परिसरासाठी पर्यावरणीय आपत्ती

## तालुका प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष अन् पर्यावरणाचा ऱ्हास

दैनिक वादळ वार्ता
**रवींद्र वळवी मोलगी । प्रतिनिधी**

अक्कलकुवा तालुक्यात सध्या ठिकठिकाणी विना परवाना गुराळ (गूळ उत्पादन केंद्रे) सुरू असल्याचे चित्र अत्यंत चिंताजनक आहे. विशेष म्हणजे ही गुराळ थेट शेतजमिनीत उभारण्यात आली असून, त्यातून होणारे वायू, मृदा व जलप्रदूषण परिसरातील पर्यावरणासाठी गंभीर धोका ठरत आहे. निसर्गरम्य व आदिवासीबहुल असलेल्या या भागात अशा बेकायदेशीर उद्योगांना मिळणारे अप्रत्यक्ष संरक्षण हे तालुका प्रशासनाच्या अक्षम्य दुर्लक्षाचे द्योतक आहे.गुराळीतून तयार होणाऱ्या रासायनिक गुळामुळे केवळ पर्यावरणच नव्हे, तर नागरिकांचे आरोग्यही धोक्यात येते. ऊस रस उकळताना वापरले जाणारे रसायन,निकृष्ट इंधन,तसेच धुराचे प्रचंड उत्सर्जन यामुळे हवेतील प्रदूषण वाढले आहे. गुराळीतून बाहेर टाकले जाणारे सांडपाणी थेट जमिनीत मिसळत असल्याने मातीची सुपीकता नष्ट होत असून,भूजलसाठ्यावरही विपरीत परिणाम होत आहे.



आदिवासी भागातील नागरिकांचे मुख्य जीवनाधार शेती व निसर्गावर अवलंबून आहे. मात्र महसूल यंत्रणेला चिरीमिरी देऊन वरचेवर गुराळ सुरू आहेत,अशा बेकायदेशीर गुराळींमुळे शेतीचे नुकसान होत असून, पिकांवर वाईट परिणाम दिसून येत आहेत. तरीही संबंधित विभाग, महसूल प्रशासन, प्रदूषण नियंत्रण मंडळ व स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याकडून ठोस कारवाई होत नसल्याचे वास्तव आहे.

**परवानग्यांचा प्रश्न आणि कायदेशीर जबाबदारी**

कोणतेही गुराळ सुरू करण्यासाठी खालील आवश्यक परवानग्या असणे बंधनकारक आहे –

१) तहसील कार्यालयाची परवानगी (जमिनीचा वापर – एनए/औद्योगिक)
२)ग्रामपंचायतीची लेखी संमती
३)महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची स्थापना परवानगी व संचालन परवानगी
४)अन्न व औषध प्रशासनाची नोंदणी/परवानगी
५) वीज वितरण कंपनीची अधिकृत वीज जोडणी
६)अग्निशमन विभागाची सुरक्षितता प्रमाणपत्र
७)साखर महासंघाची परवानगी

**प्रशासनाची भूमिका आणि अपेक्षा**

जिल्हाधिकाऱ्यांनी याकडे तातडीने लक्ष द्यावे सर्व गुराळींची तपासणी करून विना परवाना सुरू असलेल्या केंद्रांवर कठोर कारवाई करणे आवश्यक आहे. दंडात्मक कारवाई, गुराळ जप्ती व उत्पादन थांबविणे यासारखी पावले उचलली नाहीत,तर भविष्यात याचे गंभीर पर्यावरणीय व सामाजिक परिणाम भोगावे लागतील.हा प्रश्न केवळ कायद्याचा नाही, तर आदिवासी भागाच्या अस्तित्वाचा व निसर्गसंवर्धनाचा आहे. प्रशासनाने डोळेझाक करण्याऐवजी जबाबदारी स्वीकारून पर्यावरण रक्षणासाठी ठोस निर्णय घेणे ही काळाची गरज आहे.

# दोन मुलांची आई लागली परपुरुषाच्या नादी अनैतिक संबंधाला कंटाळून केली नवऱ्याने आत्महत्या

## पत्नी, सासू आणि पत्नीच्या प्रियकराच्या छळाला कंटाळून ४० वर्षीय इससमाची आत्महत्या

## तिघांविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा तर पत्नीच्या प्रियकरा विरुद्ध ट्रॉसिटीचा गुन्हा दाखल

दैनिक वादळ वार्ता
**गौतम बचुटे । केज**

दोन मुलांची आई असलेल्या महिलेचे एका परजातीतील इसमा सोबत असलेल्या अनैतिक संबंधाला आणि त्या इसमासह ती महिला व तिची आई या सर्वांच्या शारीरिक व मानसिक छळाला कंटाळून केज येथे एका ४० वर्षीय इसमाने घरातील आडूला साडीने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे.या बाबतची माहिती अशी की हाउसिंग सोसायटी केज येथील आश्रुबा उर्फ उत्तम शिवाजी जाधव या इसमाच्या पत्नी मनीषाचे केज येथील मयूर पाटील देशमुख या परजातीच्या एका अविवाहित तरुणाशी मागील एक वर्षा पासून अनैतिक सबंध होते. मनीषा हिला तिचा प्रियकर मयूर देशमुख–पाटील याने केज येथील धारूर रोड येथे एक खोली भाड्याने करून दिली होती. तिथे ते दोघे आणि मनिषा हिला आश्रुबा पासून झालेल्या दोन मुलांसह मनिषा आणि तिचा प्रियकर मयूर देशमुख पाटील हे एकत्र पती–पत्नी प्रमाणे राहत होते.

दि. १९ जानेवारी २०२६ रोजी आश्रुबा जाधव हा त्याची पत्नी राहत असलेल्या धारूर रोड भागातील तिच्या खोलीवर गेला. तेव्हा त्याला त्याची पत्नी मनिषा जाधव आणि मनिषा हिचा प्रियकर मयूर देशमुख पाटील यांनी त्याला धक्काबुक्की करून जातीवाचक शिवीगाळ केली. तसेच मनिषा आणि तिचा प्रियकर मयूर देशमुख पाटील यांनी त्याला तेथून हाकलून दिले होते. तसेच त्याला मारहाण करून जीवे मारण्याची देखील धमकी दिली होती. यामुळे आश्रुबा जाधव याने पत्नी मनिषा, तिचा प्रियकर मयूर देशमुख पाटील आणि सासू मंगल भारत खाडे यांच्या शारीरिक व मानसिक त्रासाला आणि पत्नीच्या अनैतिक संबंधाला कंटाळून हाउसिंग कॉलनी येथील त्याच्या राहत्या घरी लोखंडी लागला अँगला साडीने गळफास घेऊन आत्महत्या केली.



या प्रकरणी मयत आश्रूबा जाधव यांचे भाऊ युवराज जाधव यांच्या तक्रारी वरून केज पोलिस ठाण्यात मयूर प्रताप पाटील देशमुख, मयताची पत्नी मनिषा जाधव आणि सासू मंगल भारत खाडे यांच्या विरुद्ध गु. र. नं. २८/२०१६ ट्रॉसिटीचे कलम ३(१)(आर), ३(१)(एस), ३(२)(व्ही ए), ३(व्ही) भा. न्या. सं. १०८, ११५(२), ३५१(२),३५२, ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी सहाय्यक पोलिस अधीक्षक व्यंकटराम हे तपास करीत आहेत.

गुन्हा दाखल होताच सर्व आरोपी जेरबंद :– गुन्हा दाखल होताच आश्रूबा जाधव यांच्या आत्महत्या प्रकरणी मयूर प्रताप पाटील देशमुख, मयताची पत्नी मनिषा जाधव आणि सासू मंगल भारत खाडे या तिघांनाही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्या सर्व आरोपींची कसून चौकशी केली जात आहे.

घटनेच्या एक दिवस अगोदर काय झाले. ? :– आश्रूबा जाधव हा त्याच्या भाऊ आणि भावजई सोबत सोलापूर जिल्ह्यातील साखर कारखान्यावर ऊस तोडणी करण्यासाठी गेला होता. परंतु दि. १३ रोजी त्याचा मुलगा स्वागत जाधव यांनी फोन करून भेटायला या म्हणून त्याला केज येथे बोलावून घेतले. त्याच दिवशी आश्रुबा जाधव हा केजकडे यायला निघाला. त्या नंतर दि. १९ जानेवारी रोजी त्याची पत्नी तिचा प्रियकर मयूर देशमुख पाटील याने करून दिलेल्या धारूर रोड जवळील भाड्याच्या खोलीवर गेला. तिथे त्याला मयूर देशमुख पाटील, पत्नी मनिषा जाधव आणि सासू मंगल खाडे यांनी जातीवाचक शिवीगाळ करून मारहाण केली. तसेच त्याला जीवे मारण्याची धमकी दिली.

त्या नंतर दि. २० जानेवारी रोजी सकाळी मनिषा जाधव आणि तिची आई मंगल खाडे या आश्रुबा जाधव याच्या हाऊसिंग कॉलनी येथील घरी आल्या आणि घरातील सामान घेऊ जावू लागल्या. त्यावेळी आश्रूबा जाधव या त्यांनी शिवीगाळ केली. त्या नंतर त्याच दिवशी दुपारी आश्रूबा जाधव याने घरी लोखंडी अडुला गळफास घेतला.

# विदेशी गुंतवणूकीसाठी महाराष्ट्र भारताचे 'गेटवे ऑफ इंडिया'

## राज्याच्या सर्व भागासाठी वैविध्यपूर्ण क्षेत्रात गुंतवणूक येणार–देवेंद्र फडणवीस

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

'महाराष्ट्र विश्वासार्ह आहे. आम्ही जे सांगतो. ते करतो. त्यामुळेच जगभरातील उद्योजक, गुंतवणूक दारांचा महाराष्ट्रावर विश्वास वाढला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विकसित भारत वाटचालीसाठी पार्श्वभूमी निर्माण केली आहे. एक एकोसिस्टम तयार केली आहे. त्याआधारे यंदाही महाराष्ट्रात प्रचंड प्रमाणात गुंतवणूक येईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. महाराष्ट्र हे भारतात येणाऱ्या गुंतवणुकीसाठी गेटवे ऑफ इंडिया आहे. त्यामुळे भारतातील अन्य राज्यांशी आमची चांगल्या अर्थाने स्पर्धा आहे. सरतेशेवटी देशासाठी ही बाब चांगलीच ठरते. पण यातही महाराष्ट्र पुढे आहे याचा अभिमान असल्याचेही त्यांनी सांगितले.वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या वार्षिक बैठकीकरिता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत यांच्यासह प्रतिनिधी मंडळासमवेत दावोस येथे दाखल झाले आहेत. या दरम्यान त्यांनी आज महाराष्ट्र पॅव्हेलीयनमध्ये माध्यमांशी संवाद साधला. महाराष्ट्रातील सर्व भौगोलिक क्षेत्रासाठी गुंतवणूक मिळवणार असून. त्यासाठी वैविध्यपूर्ण अशा दहा ते बारा क्षेत्रातील उद्योगांशी समन्वय साधला जात आहे. आता तिसरी मुंबई उभी राहते आहे. तिच्यासाठी मोठी गुंतवणूक मिळण्याचे संकेत आहेत. आमच्याकडे उत्तम मेन्यू कार्ड आहे. त्यामुळे गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यात यशस्वी होऊ, असे फडणवीस म्हणाले. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमची वार्षिक बैठक ही उद्योग, गुंतवणूकदारासाठी एक प्रकारे चावडी आहे. याठिकाणी दरवर्षी आम्ही महाराष्ट्राकडे काय आहे, कोणती क्षमता आहे, हे



शोकेस करण्यासाठी येत असतो. यंदाही गतवर्षीच्या तुलनेत आणखी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक येईल असा विश्वास आहे. कारण देशात अशा प्रकारे येणारी गुंतवणूक व त्याबाबतचे करार करण्यात महाराष्ट्र अग्रेसर आहे. अशाप्रकारे सुमारे ६० ते ६५ करार प्रत्यक्षात आणण्यात महाराष्ट्राला यश मिळाले आहे. दावोस परिसर निसर्गसौंदर्याने नटलेला आहेच. इथे उद्योगजगत एकत्र येतो. महाराष्ट्रातून आलेल्या उद्योजकांनी या मंचाचा पुरेपूर उपयोग करावा, असे आवाहन देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केले.दरम्यान, सकाळ मीडिया ग्रुपच्या ग्लोबल इॅम्पॅक्ट फोरमवर देवेंद्र फडणवीस यांची प्रकट मुलाखत झाली. त्यावेळी ते म्हणाले, गेल्या दशकात महाराष्ट्राने सरासरी १० टक्क्यांहून अधिक विकासदर कायम राखला असून, राज्य २०३२ पर्यंत देशातील पहिले ट्रिलियन डॉलर्सची असणारी अर्थव्यवस्था बनू शकते. मात्र, हा टप्पा आणखी वेगाने २०३० पर्यंत गाठण्याचे उद्दिष्ट आहे.देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले की, सध्याची जागतिक भू–राजकीय परिस्थिती आव्हानात्मक असली, तरी आंतरराष्ट्रीय संस्थांच्या अंदाजानुसार भारत हा जागतिक अर्थव्यवस्थेतील 'ब्राइट स्पॉट' आहे. जगभरातील विकासदर मंदावले असताना, महाराष्ट्र मात्र आपला विकासदर टिकवून ठेवण्यात यशस्वी ठरत आहे आणि राज्यात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक येत आहे.सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग (एमएसएमई) हे अर्थव्यवस्थेचा कणा असून रोजगारनिर्मितीत त्यांचा सर्वाधिक वाटा आहे. केंद्र व राज्य सरकार एमएसएमईंना प्रोत्साहन देत आहे. केवळ भांडवल नव्हे, तर आजच्या काळात विश्वासार्हता हा सर्वात मोठा घटक आहे. त्याचबरोबर, महाराष्ट्राने दिलेल्या प्रत्येक आश्वासनाची पूर्तता केली असून, राज्याचा ट्रॅक रेकॉर्ड आश्वासक असल्याचे त्यांनी सांगितले.गेल्या वर्षी महाराष्ट्रात तब्बल १६ लाख कोटी रुपयांचे सामंजस्य करार झाले. यात प्रत्यक्ष गुंतवणुकीत रूपांतरित व्हावेत यासाठी राज्याने स्वतंत्र ट्रॅकिंग यंत्रणा उभारली आहे. देशपातळीवर जिथे सामंजस्य करारांचे रूपांतरण प्रमाण साधारणतः २५ ते ३० टक्के असते, तिथे महाराष्ट्रात हे प्रमाण ५० ते ५५ टक्के असून, दावोस करारांच्या बाबतीत ७५ ते ८० टक्क्यांपर्यंत पोहोचले आहे. जमीन वाटप, मंजुरी प्रक्रिया, तसेच 'वॉर रूम'च्या माध्यमातून प्रत्येक गुंतवणूकदाराला उद्योग क्षेत्राशी जोडून ठेवण्यात येत असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.नवी मुंबई विमानतळाजवळ एज्यु–सिटी, इनोव्हेशन सिटी, स्पोर्ट्स सिटी, मेडिसिटी आणि जीसीसी सिटी उभारली जात असून, या एकत्रित प्रकल्पातून सुमारे ३५ लाख उच्च वेतनाच्या नोकऱ्या निर्माण होतील, असे सांगत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, या संपूर्ण क्लस्टरमुळे भारताच्या अर्थव्यवस्थेत क्रांतिकारी बदल घडणार आहे.वाढवण हे जगातील टॉप १० बंदरांपैकी एक असून जेएनपीटीपेक्षा तीनपट मोठे असलेले हे बंदर जगातील सर्वात मोठ्या जहाजांना सामावून घेण्यास सक्षम असेल. पुढील तीन वर्षांत पहिला टप्पा कार्यान्वित होईल, आणि पुढील १०० वर्षांसाठी भारताच्या सागरी व पुरवठा साखळीला बळ देईल, असे त्यांनी यावेळी सांगितले. उद्योगविकासासाठी कायदा व सुव्यवस्था अत्यंत महत्त्वाची असून, महाराष्ट्रात 'झिरो टॉलरन्स' धोरण राबवले जात आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. महाराष्ट्रात गुंतवणूक सुरक्षित आहे, विश्वासार्ह आहे आणि भविष्यासाठी सर्वोत्तम असल्याचेही त्यांनी सांगितले.

# औसा तालुक्यात सर्वच पक्षांनी स्थानिक निष्ठावंत कार्यकर्त्यांना न्याय द्या ?

## अनेक जिल्हा परीषद गटात आयात उमेदवारांना उमेदवारी देण्याची चर्चा ? मग निष्ठावंत कार्यकर्त्यांनी फक्त सतरंज्या उचलायच्या का ?

**दैनिक वादळ वार्ता**
**औसा | प्रतिनिधी**

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत आयत्या वेळी अर्थीक भक्कम असलेला आयात उमेदवार लादु नये सर्वपक्षीय कार्यकर्त्यांची अपेक्षा

संबंध राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या हालचालींना वेग आला आहे. १३ ऑक्टोबर २०२५ रोजी जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्या साठी आरक्षण सोडत झाली आहे. आता फक्त अवघे काही तास उमेदवारी दाखल करण्यासाठी उरलेले आहेत . तरी आणखीन कोणत्याच पक्षाचा उमेदवार निश्चित झाले नसुन .औसा पंचायत समिती सभापती पद हे अनुसुचित पुरूषाला आरक्षीत असल्याने निवडणुकी मध्ये मोठी चुरस होण्याची शकता वर्तवली जात असुन . अनेक बडे दिग्गज कार्यकर्ते निवडणुक आखाड्यात आपल भवितव्य आजमावण्यासाठी उत्सुक असल्याचे दिसून येत आहे. परंतु सर्वांचेच लक्ष आपापल्या नेत्याकडे लागलेचे दिसून येत आहे. ग्रामिण भागातील स्थनिक कार्यकत्यांना सतत एकच प्रश्न भेडसावत असल्याचे बोलले जात आहे. ते म्हणजे निष्ठावंत कार्यकत्यांना न्याय मिळेल की पैशातून सत्ता व सत्तेतून पैसा अशा उमेदवारांना उमेदवारी मिळेल. तसेच मतदारसंघातील निष्ठावंत कार्यकर्ते सोडून आयत्या वेळी अर्थीक बाजु भक्कम असलेला आयात उमेदवार देऊन लादुन निष्ठावंत कार्यकत्यांवर अन्याय केला जाईल की काय अशी भीती स्थानिक निष्ठावंत कार्यकत्यांमधुन व्यक्त होत आहे.स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा बिगुल वाजल्याने तालुक्यातील सर्वच गटा मध्ये इच्छुया ही उमेदवारांची गर्दी होत आहे. सर्वच राजकीय पक्ष ताकदीने निवडणूक लढविणार आहेत. आपल्या मर्जीतला उमेदवार असायला पाहिजे, यासाठी खासदार, आमदार सह लोकनेते यांची आपल्या निकटवर्तीयासाठी आग्रही असल्याच ही पहायला मीळत आहेत , सर्वच पक्षाचे कार्यकर्ता असो की पक्षाचा निष्ठावंत कार्यकत्यांना पक्षश्रेष्ठींनी तिकीट देऊन न्याय द्यावा, अशी निष्ठावंत कार्यकत्यांनी अपेक्षा व्यक्त केली आहे. सध्यातरी सर्वच पक्षांमधील कार्यकर्ते निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याची ईच्छाशक्ती सोशल मीडियाच्या माध्यमातून आपापलनी उमेदवारीसाठी ताकद दाखवत आहेत . मतदारसंघाशी नाळ नसलेला व मतदारांची ओळख नसलेला व गटाशी ठावठिकाणा माहिती नसलेला कार्यकताहीं मी उमेदवार महणून मिरवत आहे. खासदार, आमदारांच्या मर्जीतले कार्यकर्ते आनोळखी मतदार संघ मागणी करुन आपल नशिब आजमावण्यासाठी



आग्रही आहेत. त्यातच अनेक कंत्राटदार पैशाच्च्या जोरावर निवडणुकीच्या मैदानात उतरण्याची चर्चा होत आहे.व अशे अनेक गुत्तेदार आपली गुत्तेदारी चालावी आसाठी उमेदवारी मीळावी मनुन वशिलेबाजी चालत असल्याचही दीसत आहे ,तरी सर्वसामान्य कार्यकत्यांनी आजवर घरची भाजी भाकरी खाउन आपापल्या पक्ष्यांचे झेंडे घेऊन,माईकवर भाषणे करने व आपल्या नेत्यांच कौतुक करत पक्ष आणि साहेबांचा जय जयकार करायचा आणि पक्षाच्या आदेशानुसार सतरंज्या उचलायचा, यासाठीच व एवढेच महत्व कार्यकर्त्याला राहिले का..? असा प्रश्नही सर्वच राजकीय पक्षातील निष्ठावंत कार्यकर्ते उपस्थित करत आहेत.नेत्यांच्या घरी कार्यकत्यांची गर्दी तिकीटासाठी दिसून येत आहे. निष्ठावंत की आयात उमेदवारांना उमेदवारी मिळणार याकडे सर्वांचे लक्ष वेधले गेले आहे तरी औसा तालुक्यामध्ये तिरंगी लढत पाहावयास मिळणार आहे काँग्रेस,

भारतीय जनता पार्टी, शिवसेना (उ.बा. ठा.) सह राष्ट्रवादी .महाराष्ट्र नवनिर्मान सेना सह वंचितची लढत होईल, अशी चर्चा केली जात आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत साहेबांच्या मर्जीतल्या लोकांना संधी मिळेल की रात्रंदिवस घरची भाकर भाजी खाऊन पक्षासाठी निष्ठेने काम करणाऱ्या सामान्य निष्ठावंत कार्यकत्याला संधी मिळेल, अशी सर्वत्र कार्यकर्त्यामध्ये चर्चारंगली आहे. जर पैसे वाला आयात उमेदवार कुटल्या गटात लादला गेला तर निष्ठावंत कार्यकर्ते बंडखोरी करण्याची भीती सर्वच पक्षांना आवाहन असणार आहे , तरी ग्रामिन भागात सर्व पक्षीय नेत्यांनी आपापल्या निष्ठावंत कार्यकर्त्याला उमेदवारी दयावी अशी मागणी जोर धरत असुन अनेक गटात व पंचायत समिती गणात जर आयात उमेदवार दीला गेला तर त्या आयात उमेदवारांना मोठी कसरत करावी लागणार असल्याने पक्षाने निष्ठावंताला न्याय दयावा व जिल्हा परीषद पंचायत समिती निवडणुकीत स्थानीक उमेदवारांना प्राधान्य दयावे

# गडचिरोली जिल्ह्यातील साखरा रेती घाटावर अवैध उत्खननाचा उच्छाद, प्रशासन गप्प!

**दैनिक वादळ वार्ता**
**देसाईगंज | प्रतिनिधी**



गडचिरोली जिल्ह्यातील साखरा येथील शासकीय रेती घाटावर मोठ्या प्रमाणात अवैध रेती उत्खनन व तस्करी सुरू असून शासनाच्या नियमांना खुलेआम हरताळ फासण्यात येत आहे. शासनाने ठरवून दिलेला प्रती ब्रास ६०० रुपये दर केवळ कागदावरच उरला असून प्रत्यक्षात रेती माफियांकडून ५००० रुपये प्रती ब्रास दराने रेती विक्री केली जात आहे. तर परवानगीशिवाय रेती २५०० रुपये प्रती ब्रास दराने खुलेआम विकली जात आहे.

गरिब जनतेला ६०० रुपयांत एक ब्रास रेती देण्याचा शासनाचा दावा फोल ठरत असून आजतागायत सामान्य नागरिकांना त्याचा कोणताही लाभ मिळालेला नाही. जितकी परवानगी दिली आहे, त्यापेक्षा कित्येक पटीने अधिक उत्खनन सुरू असून हे सर्व काही प्रशासनाच्या डोळ्यासमोर घडत आहे.

संबंधित विभागातील अधिकारी व कर्मचारी जाणूनबुजून डोळेझाक करत असल्याचे स्पष्ट दिसून येते. आजपर्यंत कोणतीही ठोस कारवाई न झाल्यामुळे रेती माफियांना राजकीय व प्रशासकीय वरदहस्त असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

या अवैध उत्खननामुळे शासनाचा मोठ्या प्रमाणात महसूल बुडत असून सामान्य व गरीब नागरिकांना महागडी रेती खरेदी करण्यास भाग पाडले जात आहे. प्रश्न असा आहे की हा सर्व गैरव्यवहार नेमका कुणाच्या आशीर्वादाने सुरू आहे? आणि गरीब जनतेची ही लूट कधी थांबणार?

जिल्हा प्रशासनाने तात्काळ साखरा रेती घाटावर छापा टाकून दोषींवर कठोर कारवाई करावी, अन्यथा जनतेमध्ये तीव्र संताप व्यक्त होऊन आंदोलनाचा मार्ग स्वीकारला जाईल.

# जिवती तालुक्यात रेशन कार्ड बंद पडल्याने गरीब कुटुंबांवर उपासमारीची वेळ

## अन्न पुरवठा अधिकाऱ्यांचा मनमानी कारभार दोन हजार द्या आणि अंत्योदय रेशनकार्ड बनवा

**दैनिक वादळ वार्ता**
**जिवती | प्रतिनिधी**

जिवती:जिवती तालुक्यातील अन्न पुरवठा अधिकाऱ्यांच्या कथित मनमानी कारभारामुळे अनेक गरीब कुटुंबांचे अंत्योदय अंत्योदय रेशन कार्ड बंद पडले असून, यामुळे या कुटुंबांवर उपासमारची परिस्थिती निर्माण झाली आहे. पैशाच्या लालसेने अनेक कुटुंबांचे कार्ड बंद करून इतरांना नवीन अंत्योदय रेशन कार्ड बनवून दिल्याचा आरोप होत आहे.हा प्रकार मागिल अनेक दिवसांपासून सुरू असून दोन हजार दिल्यास नविन अंत्योदय रेशनकार्ड बनवून दिल्या जात आहेत मात्र पुर्वीचे चालू असलेले अंत्योदय रेशनकार्ड बंद करून रेशन बंद करून उपासमारीची पाळी आणली आहे.यासंदर्भात शिवसेना तालुका संघटक गणेश पवार यांनी या प्रकरणाची तातडीने चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी करत आज तहसीलदार, जिवती यांच्याकडे तीव्र निवेदन सादर केले. या वेळी शिवसेनेचे संपर्क प्रमुख अरविंद चव्हाण उपस्थित होते.

जिवती तालुका हा पूर्णपणे डोंगराळ आणि दुर्गम असल्याने येथील बहुसंख्य लोक शेतमजुरीवर अवलंबून आहेत. रेशन कार्ड बंद पडल्यामुळे मूलभूत अन्नधान्याचा पुरवठा थांबला असून, अनेक कुटुंबांमध्ये उपासमारची परिस्थिती उद्भवली आहे. रेशन कार्ड दुरुस्ती किंवा पुन्हा सुरू करण्यासाठी नागरिकांना वारंवार तहसील कार्यालय गाठावे लागते. डोंगराळ रस्ते, वाहतूक सुविधांचा अभाव आणि प्रवासाचा खर्च यामुळे हे अधिक कष्टदायक आणि आर्थिकदृष्ट्या भारावणारे ठरत आहे.शिवसेना नेते गणेश पवार यांनी सांगितले, सरकारने रेशन कार्ड शुद्धीकरण आणि e-KYC अभियान राबवले असले तरी, या दुर्गम भागातील अशिक्षित आणि गरीब नागरिकांना याची पूर्ण माहिती मिळाली नाही. परिणामी त्यांचे कार्ड बंद पडले आणि आता ते उपाशी राहण्याची वेळ आली आहे. हे पूर्णपणे अन्यायकारक आहे. तात्काळ या सर्व कार्ड्स सक्रिय करावीत, दुरुस्ती प्रक्रिया सुलभ करावी आणि गरजू कुटुंबांना त्वरित देण्याची मागणी निवेदनातून केली आहे.

# कवळे गुरूजी यांच्या वतीने भोकर नगरपरिषदेच्या नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार संपन्न



**दैनिक वादळ वार्ता**
**भोकर | प्रतिनिधी**

व्हिपिके पतसंस्थेच्या वतीने संस्थेचे चेअरमन श्री मारोतराव कवळे गुरूजी भोकर नगर परिषदेच्या नवनिर्वाचित नगरसेवक व प्रतिनिधी यांचा सत्कार सोहळा संपन्न यावेळी उपस्थित नगराध्यक्ष श्री भगवानरावजी दंडवे उपनगराध्यक्ष श्री दिलीप काका सोनावडे , नगरसेवक श्री दिनेश लक्षद्वार, श्री विठ्ठल धोंडगे,श्री सुहास पवार,श्री विजय पवार,श्री सिद्धार्थ पिटलेवाड, श्री गणेशराव यशवंतकर, भाजपा भोकर ग्रामीणचे अध्यक्ष श्री दिवाकर रेड्डी शहराध्यक्ष श्री विशाल माने संस्थेचे सल्लागार व्यंकटेश असावा उपस्थित होते ...

यावेळी संस्थेचे चेअरमन मारोतराव पाटील कवळे गुरूजी यांच्या हस्ते सर्वांचा सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या.

# सिरोंचा: नारायणपूर येथील पांदण रस्ते चिखलमय; खड्ड्यांमुळे शेतकऱ्यांची दैना

**दैनिक वादळ वार्ता**
**सिरोंचा | प्रतिनिधी**



सिरोंचा तालुक्यातील नारायणपूर ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या पांदण रस्त्यांची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. पावसाळ्यामुळे हे रस्ते पूर्णतः चिखलमय झाले असून जागोजागी पडलेल्या खड्ड्यांमुळे शेतकऱ्यांना आपल्या शेतात जाणे कठीण झाले आहे. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे या भागातील शेतीची कामे रेंगाळली असून ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

मुख्य समस्या:

चिखलाचे साम्राज्य: पावसाळ्याच्या सुरुवातीलाच रस्त्यांवर गुडघाभर चिखल साचला आहे. यामुळे पायदळ चालणेही जिकिरीचे झाले आहे.

शेतकऱ्यांचे हाल: सध्या पेरणी आणि मशागतीचे दिवस आहेत. मात्र, चिखलामुळे बैलगाडी किंवा ट्रॅक्टर शेतात नेणे अशक्य झाले आहे.

अपघाताची भीती: रस्त्यावरील मोठ्या खड्ड्यांमुळे दुचाकी घसरून किरकोळ अपघात होण्याच्या घटना वाढल्या आहेत.

प्रशासकीय दुर्लक्ष:

नारायणपूर ग्रामपंचायत आणि संबंधित विभागाने या पांदण रस्त्यांच्या दुरुस्तीकडे अनेकदा दुर्लक्ष केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. दरवर्षी पावसाळ्यात हीच परिस्थिती उद्भवते, मात्र यावर कोणताही कायमस्वरूपी तोडगा काढला जात नाही. आम्ही महसूल भरतो, मग आम्हाला मूलभूत सुविधा का मिळत नाहीत? असा संतप्त सवाल स्थानिक शेतकऱ्यांनी विचारला आहे.

रस्त्यांची अवस्था इतकी वाईट आहे की शेतात खत किंवा बी-बियाणे नेणे देखील कठीण झाले आहे. लोकप्रतिनिधींनी याकडे लक्ष देऊन तत्काळ खडीकरण करावे. स्थानिक शेतकरी, नारायणपूर,राजशेखर भिमकारी,

मागणी: नारायणपूर भागातील या पांदण रस्त्यांचे तत्काळ पंचनामे करून तिथे मुरूम किंवा खडीकरण करण्यात यावे, जेणेकरून शेतकऱ्यांचा रस्ता मोकळा होईल. जर लवकर दुरुस्ती झाली नाही, तर तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.

# देसाईगंज नगरपरिषद स्थायी व विषय समितींच्या निवडणुका यशस्वीरीत्या संपन्न

**दैनिक वादळ वार्ता**
**देसाईगंज | प्रतिनिधी**



देसाईगंज नगरपरिषदेत स्थायी समिती तसेच विविध विषय समित्यांच्या निवडणुका आज शांततापूर्ण व यशस्वीरीत्या पार पडल्या. सदर निवडणूक प्रक्रिया पीठासीन अधिकारी प्रसेनजीत प्रधान, उपविभागीय अधिकारी, देसाईगंज यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी सतीश चौधरी, मुख्याधिकारी, नगरपरिषद देसाईगंज उपस्थित होते.

निवडणूक प्रक्रियेनंतर पुढीलप्रमाणे समित्यांची रचना करण्यात आली आहे -

सार्वजनिक बांधकाम समिती
सभापती - नरेश विठलानी
सदस्य - राहुल सतवानी, एम. युनुस एम. युसुफ शेख, विकास प्रधान, गुरमीतकौर चावला

स्वच्छता, वैद्यकीय व आरोग्य समिती
सभापती - चैतनदास विधाते
सदस्य - लता मुळे, विलास लोखंडे, श्याम उईके, विकास प्रधान

पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती
सभापती - सचिन खरकाटे
सदस्य - राहुल सतावाणी, भारती कुथे, राधिका पत्रे, श्याम उईके

महिला व बालकल्याण समिती
सभापती - भाविआ साधवानी
उपसभापती - पार्वताबाई बेदरे
सदस्य - लता मुळे, मंदा समर्थ, फैमिदा पठाण

शिक्षण समिती
सभापती - बाळकृष्ण माडुरवार
सदस्य - पल्लवी मेंढे, ज्योत्सना लुटे, आशा दहिवले, राधिका पत्रे

नियोजन समिती
सभापती - पिंकू बावणे
सदस्य - विलास मारोती लोखंडे, भारती कुथे, विकास प्रधान, श्याम उईके

स्थायी समिती
सभापती - लता सुंदरकर
सदस्य - नरेश विठलानी, चैतनदास विधाते, सचिन खरकाटे, भाविआ साधवानी, बाळकृष्ण माडुरवार, पिंकू बावणे

नवीन निवडून आलेल्या सर्व सभापती व सदस्यांचे नगरपरिषदेच्या वतीने अभिनंदन करण्यात आले असून, देसाईगंज शहराच्या सर्वांगीण विकासासाठी सर्व समित्या समन्वयाने कार्य करतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. या कार्यक्रमाचा वेळत उपस्थित मान्यवर आरमोरी विधानसभा क्षेत्राचे आमदार रामदास मसराम.. मा. आमदार कृष्णा गजबे.. मा. उपाध्यक्ष मुरली सुंदरकर.. मा. मोतीलाल कुकरेजा.

मा. नगराध्यक्ष किसन नागदेवे. कुरखेडा उपाध्यक्ष बबलु हुसैनी.. युवा उद्योगपती आकाश अग्रवाल..नितीन राऊत.. परसराम टिकले.. दुबे महाराज व अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# अप्सरे'ची साद,विकासाची वाट: गाव समृद्ध करायचे असेल, तर एकीची वज्रमुठ हवी!-सोनाली कुलकर्णी

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

स्पर्धा फक्त कागदावरची नसते, ती मनामनातून जिंकायची असते. गावाचा कायापालट करण्यासाठी केवळ सरपंच किंवा ग्रामसेवक पुरेसे नाहीत; तर प्रत्येक गावकऱ्याने जेव्हा स्वतःला 'विकासाचा दूत' मानले, तेव्हाच आपले गाव राज्याच्या आणि देशाच्या नकाशावर नंबर वन होईल, असे जळजळीत आवाहन प्रसिद्ध सिने अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांनी केले.

शहादा तालुक्यातील बामखेडा आणि जयनगर येथे 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियाना' च्या निमित्ताने आयोजित जनसंवाद कार्यक्रमात त्या बोलत होत्या. शासनाच्या या अभियानाचा प्रसार करण्यासाठी आलेल्या सोनाली कुलकर्णी यांना पाहण्यासाठी आणि त्यांचे विचार ऐकण्यासाठी दोन्ही गावांमध्ये जनसागर उसळला होता.व्यासपीठावरून गावकऱ्यांशी थेट हितगुज साधताना सोनाली कुलकर्णी यांनी लोकसहभागाचे महत्त्व पटवून दिले. त्या म्हणाल्या, स्पर्धा जिंकल्यानंतर अनेकदा आपण सुस्तावतो, पण खऱ्या अर्थाने विकास ही सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे. ही विकासाची संस्कृती आपण आपल्या पुढच्या पिढीला वारसा म्हणून दिली पाहिजे. चार टप्प्यांतील या स्पर्धेत प्रत्येक टप्प्यावर जिद्दीने लढा आणि बामखेडा-जयनगरचा डंका संपूर्ण महाराष्ट्रात वाजवा. यावेळी अभिनेत्रीने केवळ भाषण न करता प्रत्यक्ष जमिनीवर उतरून विकासकामांची पाहणी केली. काही नवीन प्रकल्पांचे



त्यांच्या हस्ते उद्घाटनही करण्यात आले.

बामखेडा येथील सरपंच मनोज चौधरी यांनी गाव कशाप्रकारे केंद्र आणि राज्य शासनाच्या योजना राबवून 'आदर्श गाव' बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे, याचे सादरीकरण केले. माजी सरपंच लीना चौधरी यांनी गावाच्या आध्यात्मिक आणि सांस्कृतिक समृद्धीवर प्रकाश टाकला.जयनगर गावाचे उपसरपंच ईश्वर माळी यांनी गावात राबवण्यात येत असलेल्या नाविन्यपूर्ण लोकोपयोगी उपक्रमांची माहिती दिली, ज्याचे कौतुक सोनाली कुलकर्णी यांनी आवर्जून केले.


या सोहळ्याला जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी उदयकुमार कुसुरकर, गटविकास अधिकारी महेश पोतदार यांनी प्रशासकीय मार्गदर्शक म्हणून उपस्थिती लावली. तसेच बामखेड्याचे सरपंच मनोज चौधरी, उपसरपंच नितीन चौधरी, पोलीस पाटील डॉक्टर योगेश चौधरी, ग्रामसेवक हिम्मतराव वंजारी आणि जयनगरच्या सरपंच मोगरा सोनवणे, ग्रामसेवक बीए पाटील यांच्यासह स्थानिक पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. विष्णू जोंधळे आणि श्री वाल्हे यांनी कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन केले.

## कै.आश्रुबा चंद्रभान काकडे यांच्या ७ व्या पुण्यस्मरणानिमित्त माजी सैनिकांचा सन्मान सोहळा

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

साबला (ता. केज, जि. बीड) येथील थोर माजी सैनिक कै. आंध्रवा चंद्रभान काकडे यांच्या ७व्या पुण्यस्मरणानिमित्त भव्य माजी सैनिक सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम शुक्रवार, दिनांक २३ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता साबला येथे संपन्न होणार आहे.

या पुण्यस्मरण व सन्मान सोहळ्यानिमित्त देशसेवेत योगदान देणाऱ्या माजी सैनिकांचा गौरव करण्यात येणार असून, कार्यक्रमास आदर्श सरपंच व राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त मा.



श्री. भास्कर पेरे पाटील हे प्रमुख उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या मार्गदर्शनामुळे कार्यक्रमाची शोभा अधिक वाढणार आहे.

सदर कार्यक्रमाचे आयोजन कै. आश्रुबा चंद्रभान काकडे यांचे चिरंजीव श्री. विलास आश्रुबा काकडे, श्री. दत्तकुमार आश्रुबा काकडे तसेच समस्त काकडे परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

या कार्यक्रमास माजी सैनिक, आजी-माजी सैनिकांचे कुटुंबीय, पत्रकार बांधव, सर्व नागरिक व तरुण मित्रमंडळींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. देशसेवेसाठी आपले आयुष्य अर्पण करणाऱ्या सैनिकांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी हा सोहळा प्रेरणादायी ठरणार आहे.

## अनुष्का पाटोळेला न्याय मिळवून देण्यासाठी भिमराज सेनेचे राजाभाऊ थाटे यांचा लाँग मार्च

दैनिक वादळ वार्ता
**गौतम बचुटे । केज**

लातूर येथील नवोदय विद्यालयात इयत्ता आठवीच्या वर्गात शिकत असलेली अनुष्का पाटोळे हिला व्यस्थापन करीत असलेल्या प्राचार्य, कर्मचारी, यांनी बेल्टनी बेदम मारहाण केली. त्यात तिचा मृत्य झाला. त्या नंतर त्यांनी तिने फाशी घेऊन आत्महत्या केल्याचा बनाव केला. या घटनेच्या निषेधार्थ भिमराज सेनेचे प्रमुख राजाभाऊ थाटे यांनी लातूर ते मंत्रालय मुंबई असा लाँग मार्च काढला आहे. दि. २६ मार्च रोजी तो लाँग मार्च मंत्रालयावर जाणार आहे. दरम्यान २१ जानेवारी रोजी राजाभाऊ थाटे यांचा लाँग मार्च केजमध्ये




आला होता. त्यावेळी राजाभाऊ थाटे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण केला.

यावेळी त्यांच्या सोबत रिपब्लिकन पार्टीचे तालुकाध्यक्ष दीपक कांबळे, बाबुराव गालफाडे, सरचिटणीस गौतम बचुटे, दिलीप बनसोडे, हरेंद्र तुपारे, यांच्यासह भारतीय बौद्ध महासभेचे चंद्रकांत मस्के, आणि कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी बोलताना राजाभाऊ पाटोळे यांनी अनुष्का पाटोळे हिची आत्महत्या नसून तिचा या यंत्रणेने केलेला खून आहे आणि तिला न्याय मिळवून देणारच असे सांगितले. तर या वेळी दीपक कांबळे यांनी अनुष्का पाटोळेच्या हिच्या कुटुंबासोबत सर्व आंबेडकरी समाज सोबत असल्याचे नमूद केले. गौतम बचुटे आणि दिलीप बनसोडे यांनीही निषेध व्यक्त केला.

## विश्वशांती आणि सत्याच्या गौरवासाठी मोलगीत घुमणार आदिवासींचा आवाज; २६ जानेवारीपासून राष्ट्रीय महासंमेलन

दैनिक वादळ वार्ता
**रवींद्र वळवी मोलगी । प्रतिनिधी**

नंदुरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा तालुक्यातील दुर्गम भाग असलेल्या मोलगी (निंबीपाडा) येथे यंदाही आदिवासी संस्कृती, आध्यात्मिक प्रबोधन आणि जागतिक शांततेचा अनोखा संगम पाहायला मिळणार आहे. 'सत्यमेव जयते'च्या जयघोषात आणि सत्याच्या गौरवार्थ २६ जानेवारीपासून चार दिवसीय राष्ट्रीय महासंमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यासाठी संपूर्ण भारतातून आदिवासी बांधव मोठ्या संख्येने एकत्र येणार आहेत.

.सी. भारत सरकार परिवार, द रेस रिलेशन बोर्ड आणि कौन्सिलेशन कमिटी (कटासवाण, गुजरात) यांच्या संयुक्त विद्यमाने हे २३ वे महासंमेलन होत आहे. गेल्या दोन दशकांहून अधिक काळ, निश्चित स्थळ आणि वेळेत कोणताही बदल न करता हे संमेलन अत्यंत



शिस्तबद्ध पद्धतीने पार पडत आहे. जागतिक शांततेचा संदेश तळागाळातील समाजापर्यंत पोहोचवणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे.

२६ जानेवारी पासून संमेलनाची सुरुवात अक्कलकुवा तालुक्यातील 'डाब' येथील याहा योगी मातेच्या देवस्थानात होईल. येथे 'विश्व शांती अजित स्तंभ आरती' आणि स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

मुख्य सत्र (२७ ते २९ जानेवारी) निंबीपाडा येथे तीन दिवस चालणाऱ्या या सत्रात समाजातील विविध ज्वलंत प्रश्नांवर चर्चा करण्यात येईल. वाढत्या समस्या आणि त्यावरील प्रभावी उपाययोजनांबाबत तज्ज्ञ मार्गदर्शन करतील.

या संमेलनाचे मुख्य आकर्षण म्हणजे केवळ आध्यात्मिकच नव्हे, तर व्यवहारिक ज्ञानावरही येथे प्रकाश टाकला जाणार आहे. चर्चेसाठी विशेष तांत्रिक मुद्दे निश्चित करण्यात आले आहेत त्यामध्ये चलन आणि बँक नोट: यातील तांत्रिक आणि कायदेशीर फरक.चलन ओळख अंतर्गत १ रुपयापासून ते २ हजार रुपयांपर्यंतच्या नोटांची सखोल माहिती.मुद्रांक शास्त्र त्यात जनरल, रेव्हेन्यू, कोर्ट, पोस्टल आणि सर्व्हिस स्टॅम्पची ओळख व वापर. मुद्रा आणि नाणी निर्मितीची प्रक्रिया.हे संमेलन आदिवासी बांधवांच्या प्रबोधनासाठी एक मोठे व्यासपीठ ठरणार आहे. या राष्ट्रीय स्तरावरील महासंमेलनास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन कौन्सिलेशन कमिटीचे डॉक्टर दिलवरसिंग वसावे आणि सी भारत सरकार परिवारातर्फे करण्यात आले आहे.

## उपविभागीय अधिकाऱ्यांनी होळ येथे मुरूम वाहतूक करणारे टिप्पर पकडले टिप्पर मालकास अडीच लाखाचा दंड

दैनिक वादळ वार्ता
**गौतम बचुटे । केज**

अवैधरित्या मुरूम उत्खनन करून वाहतूक करणारे टिप्पर मुरुमासह होळ (ता. केज) येथे अंबाजोगाईचे उपविभागीय अधिकारी दीपक वजाळे यांनी बुधवारी दुपारी पकडले. महसूल अधिकाऱ्यांनी हे टिप्पर आणून तहसील कार्यालयात लावले असून टिप्पर मालकास दोन लाख ५० हजार रुपयांचा दंड करण्यात आला आहे. अशी माहिती तहसीलदार राकेश गिड्डे यांनी दिली.

अंबाजोगाईचे उपविभागीय अधिकारी दीपक वजाळे हे प्रशासकीय कामानिमित्त बुधवारी दुपारी केजला तहसील कार्यालयात येत होते. होळ येथून येत असताना वाटेत मुरूम भरून चाललेले टिप्पर (ओ. डी. १० बी ८९४८) त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी टिप्पर चालकास टिप्पर थांबण्यास सांगितले. त्यानंतर टिप्परमध्ये मुरूम आढळून आल्याने त्यांनी सदरचे टिप्पर हे ताब्यात घेण्याचे आदेश दिले. तहसीलदार राकेश गिड्डे यांनी तलाठी, मंडळ अधिकऱ्यांसह जाऊन मुरुमाचे



टिप्पर ताब्यात घेऊन तहसील कार्यालयात आणून लावले.

दरम्यान, टिप्पर चालक आणि मालकाने कुठल्याही प्रकारची रॉयल्टी न भरता अवैधरित्या मुरूम उत्खनन करून मुरूम भरून वाहतुक केल्याचे स्पष्ट झाल्याने संबंधित टिप्पर मालकास दोन लाख ५० हजार रुपयांचा दंड करण्यात आला आहे. संबंधित टिप्पर मालक चनई (ता. अंबाजोगाई) येथील असल्याचे चालकाने सांगितले.

## जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ शाळेत जेम्स वॅट शास्त्रज्ञाची जयंती साजरी

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

दि.१९ जानेवारी २०२६ सोमवार रोजी जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ केंद्र केज मुलांची ता.केज या शाळेत जेम्स वॅट यांच्या जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेस प्राथमिक पदवीधर शिक्षक डॉ. रामकिशन ग्यानबा मुळे सर व श्री.संदीप मेघराज ठोंबरे सर यांनी पुष्पहार अर्पण करून पुजन करून अभिवादन केले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री.राजाभाऊ दत्तात्रय कदम अपग्रेड मुख्याध्यापक जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ केंद्र केज मुलांची यांनी केले.जेम्स वॅट या शास्त्रज्ञाचा जन्म दि.१९ जानेवारी १७३६ मध्ये ग्रीनॅक स्कॉटलंड मध्ये झाला.त्यांनी वाफेच्या इंजिनमध्ये सुधारणा करून त्याची कार्यक्षमता आणि उपयोगिता वाढवली. त्यांच्या या सुधारणेमुळे वाफेच्या इजिनचा वापर कारखान्यांमध्ये,खाणी मध्ये व नंतर रेल्वेमध्ये मोठ्या प्रमाणावर होऊ लागला.त्यांच्या या शोधांनी आधुनिक युगातील औद्योगिक विकासाचा पाया रचला. त्यांनी लॅटिन,ग्रीक आणि गणित विषयांचे अध्ययन केले.त्यांनी चतुर्थ यंत्र, होकायंत्र व दाबमापक इत्यादी उपकरणे तयार केली.अशी माहिती या शाळेतील



गणित,विज्ञान विषयाचे प्राथमिक पदवीधर शिक्षक श्री. संदीप मेघराज ठोंबरे सर यांनी दिली.डॉ.श्री. रामकिशन ग्यानबा मुळे सर,श्री.आबासाहेब तुळशिराम धपाटे सर, श्रीमती अंजली गोविंदराव उटीकर मॅडम,श्रीमती निलावती अनिलकुमार भोरे मॅडम,श्री.आकाश दत्तात्रय लोंढे सर,राहुल बजरंग बचुटे सर,ट्रेनी शिक्षिका रोहिणी श्रीधर काळे मॅडम यांनीही सविस्तर माहिती दिली. सोमवार रोजी बालविवाह प्रतिबंधक शपथ घेण्यात आली व बालविवाह करु नये व त्याबाबत समुपदेशन करण्यात आले.या कार्यक्रमास श्री. राजाभाऊ दत्तात्रय कदम अपग्रेड मुख्याध्यापक,डॉ. रामकिशन ग्यानबा मुळे सर,श्री.संदीप मेघराज ठोंबरे सर,श्री.राहुल बजरंग बचुटे सर,श्री. आकाश दत्तात्रय लोंढे सर,श्री.आबासाहेब तुळशिराम धपाटे सर, श्रीमती अंजली गोविंदराव उटीकर मॅडम,श्रीमती निलावती अनिलकुमार भोरे मॅडम, ट्रेनी शिक्षिका रोहिणी श्रीधर काळे मॅडम,पीएम पोषणआहार शक्ती निर्माण योजना कामगार स्वर्णमाला पवार व अनिता पवार,विद्यार्थी, विद्यार्थिनी,शिक्षणप्रेमी नागरिक अंगणवाडीताई, मदतनीस हे उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्र संचलन श्री.राहुल बजरंग बचुटे सर यांनी केले व श्री.आकाश दत्तात्रय लोंढे सर यांनी आभार मानले.

## जि.प.प्रा.शाळा डोंगरपिंपळा शाळेत आनंदनगरी मेळावा उत्साहात संपन्न

### चिमुकल्या व्यापाऱ्यांनी जिंकली ग्रामस्थांची मने

दैनिक वादळ वार्ता
**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद प्राथमिक डोंगरपिंपळा शाळेत विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी आणि त्यांना व्यवहारिक गणिताचे धडे मिळावेत या उद्देशाने आनंदनगरी (बाल आनंद मेळावा) मोठ्या उत्साहात पार पडला.या मेळाव्यात विद्यार्थ्यांनी लावलेल्या विविध खाद्यपदार्थांच्या आणि खेळण्यांच्या स्टॉल्सनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले.कार्यक्रमाचे उद्घाटन शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री.उमाकांत राख आणि सरपंच श्री.भास्कर आबा पवार,प्रमुख पाहुणे श्री.रापतवार सर,ग्रामस्थ आणि गावातील मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी बोलताना मुख्याध्यापक यांनी सांगितले की,केवळ पुस्तकी ज्ञान न देता विद्यार्थ्यांना व्यवहारज्ञान मिळावे,यासाठी अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात येते.तसेच प्रमुखपाहुणे श्री.रापतवार सरांनी बोलताना सांगितले की,या मेळाव्या च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना नफा-तोटा, खरेदी-विक्री आणि बचतीचे महत्त्व समजले. पालकांनीही या उपक्रमाचे कौतुक करत



अशा कार्यक्रमामुळे मुलांच्या व्यक्तिमत्व विकासाला चालना मिळते असे मत व्यक्त केले.शाळेच्या मैदानावर विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेले पदार्थ,घरगुती खाद्यपदार्थ,भाजीपाला आणि खेळण्यांचे छोटेखानी दुकान थाटले होते.भेळ,वडापाव, सँडविच आणि लिंबू सरबत अशा विविध स्टॉल्सवर ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली होती. विशेष म्हणजे,चिल्लर पैशांचा हिशोब आणि ग्राहकांशी संवाद साधताना विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाखाणण्या सारखा होता.यावेळी पुढील मान्यवर उपस्थित होते.श्री.उमाकांत राख शालेय समिती अध्यक्ष, संस्थापक व अध्यक्ष श्री.रापतवार सर शिक्षण मैत्रीप्रतिष्ठान,अंबाजोगाई श्री.राठोड साहेब केंद्र प्रमुख भावठाणा,श्री. नेरकर साहेब,विषयतज्ञ श्री.भास्कर आबा पवार सरपंच,डोंगरपिंपळा श्री. धनराज केंद्रे उप सरपंच डोंगरपिंपळा,संत भगवान बाबा विद्यालय डोंगरपिंपळा,ढगे सर मुख्याध्यापक,शिक्षक वृंद व विद्यार्थी,श्री.रामचंद्र पवार,व श्री.हनुमंत शेप, शालेय समिती सदस्य, श्री.सहदेव पवार, श्री.रामचंद्र शेप,गोविंद केंद्रे श्रीमती ज्योती राख, श्रीमती वैष्णवी केंद्रे, श्रीमती अश्विनी कसबे, श्रीमती राजश्री कसबे, श्रीमती मंजुषा पवार, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा डोंगरपिंपळा मुख्याध्यापक कोरटवाड सर,श्रीमती कापसे कमल कचरू,श्री.माने सुधीर शिवाजीराव,श्री.पोटलावर कृष्णा हुल्लाजी, श्री.पोपलघट अशोक सूर्यकांत,श्री.कचकलवार संजय हणमंतराव,श्री. राठोड बाळासाहेब भिल्लू शिक्षक वृंद व वरील सर्व मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित होते.हा सोहळा यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक, आणि पालकांनी विशेष परिश्रम घेतले. मेळाव्याच्या सांगता वेळी सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात आले. शेवटी राठोड सर यांनी सर्वांचे आभार मानले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077